# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 23 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं केलेल्या शतकीय कामगिरीचं कौतुक केलं. गेल्या महिन्यात इस्रोच्या शंभरव्या रॉकेट प्रक्षेपणाचे आपण साक्षीदार बनलो असून हा केवळ एक आकडा नाही तर अंतराळ विज्ञानात सतत नवे शिखर गाठण्याचा संकल्प असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. पंतप्रधान मोदी यांनी आज 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

साध्या पद्धतीनं सुरू झालेल्या या अंतराळ प्रवासात आज आव्हानांचा सामना करत प्रक्षेपण वाहनाची निर्मिती, चंद्रयान, मंगळयान, आदित्य L-1 यासारख्या यशस्वी मोहिमांसोबतच गेल्या दहा वर्षांमध्येच इतर देशांच्या अनेक उपग्रहांसह ४६० उपग्रह प्रक्षेपित करण्याचं मोठं यश इस्रोनं मिळवलं असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

येत्या राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्तानं विज्ञान विषयात आवड निर्माण व्हावी या उद्देशानं प्रत्येक विद्यार्थ्यानं 'वैज्ञानिक म्हणून एक दिवस' घालवावा असं आवाहन मोदी यांनी केलं आहे.

एआय म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर कसा करता येईल यासाठी त्यांनी तेलंगणातील आदिलाबाद सरकारी शाळेतील शिक्षक थोडासम कैलाश यांचे उदाहरण दिलं. 'आंतरराष्ट्रीय महिला दिना'निमित्त मोदी यांनी सर्व स्त्रीयांना वंदन करत देशाच्या मातृशक्तीने आपल्या स्वातंत्र्यलढ्यात आणि संविधान निर्मितीतही मोठी भूमिका बजावली असल्याचं सांगितलं. या अनुषंगानं पंतप्रधानांनी त्यांचे सामाजिक माध्यमांवरील अकाऊंटस् देशातील काही प्रेरणादायी महिलांकडे एका दिवसासाठी सोपवणार असल्याचं यावेळी जाहीर केलं. या माध्यमांतून महिलांनी आपले कार्य आणि अनुभव देशवासियांसमोर मांडण्याचं आवाहन त्यांनी केलं. उत्तराखंड इथं नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील यशस्वी खेळाडुंचे मोदी

यांनी अभिनंदन करत तंदुरुस्त आणि निरोगी राष्ट्र बनण्यासाठी ‘ओबेसिटी म्हणजेच लठ्ठपणाच्या समस्येवर मात करण्यासाठी उपाययोजना करण्याचं आवाहन केलं. यासाठी त्यांनी प्रत्येकांन आपल्या आहारातून “खाद्यतेलाचा वापर दहा टक्क्यांनी कमी करण्याचा उपाय सांगितला. यानिमित्त ऑलिंपिक पदक विजेता नीरज चोप्रा, जागतिक कुस्तीपटू निखत जरीन यांनी लठ्ठपणावर यशस्वीरित्या कसे नियंत्रण मिळवले याचा अनुभव सांगितला.

जागतिक वन्यजीव दिनानिमित्त वन्यजीवन संवर्धनाशी संबंधित असलेल्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आदिवासी बांधवांचे पंतप्रधानांनी आभार मानले. तसंच यावेळी परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

****

राज्य शासनानं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. या किल्ल्यांमध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी किल्ला आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा समावेश आहे. या अनुषंगानं, याबाबतचे सादरीकरण करण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री विधिज्ञ आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ आज पॅरिस इथं रवाना झालं आहे.

****

उत्तरप्रदेशमधील प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभमध्ये आतापर्यंत साठ कोटी चौऱ्याहत्तर लाखांहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केलं आहे. काल दिवसभरात जवळपास ४३ लाख लोकांनी पवित्र स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या १०० दिवसांच्या क्षयरोगमुक्त भारत मोहिमेअंतर्गत आतापर्यंत १० कोटींहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली असून यात पाच लाखांहून अधिक क्षयरोग रुग्ण आढळले आहेत. या मोहिमेत दहा लाख शिबिरं घेण्यात आली असून यात दोन लाख चाळीस हजार आरोग्य कर्मचारी सहभागी झाले होते.

****

मानवजातीला स्वच्छतेचा अमूल्य संदेश देणारे थोर समाजसुधारक, कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय निवासस्थानी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

****

नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३० वा दीक्षान्त सोहळा उद्या होणार आहे. विद्यापीठाच्या ९६ अभ्यासक्रमांतील एक लाख ३९ हजार २१८ विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात पदवी प्रदान केली जाणार आहे.

****

धाराशिव-बीड-औरंगाबाद रेल्वे प्रकल्पासाठी आवश्यक तपासणी करण्याचे आदेश रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वे संचालकांना काल दिले आहेत. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी वैष्णव यांच्याकडे ही मागणी केली होती. तत्कालीन उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाचा अहवाल २८ जुलै २०२२ रोजी रेल्वे बोर्डाला सादर करण्यात आला होता.

****

नांदेड इथं सुरू असलेल्या राज्यस्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेचा आज समारोप होणार आहे. गुरू गोविंदसिंहजी क्रीडा संकुलात सायंकाळी चार वाजता हा समारोप सोहळा होईल.

****